# पिंपरी चिंचवडला गव्हर्नन्स पुरस्कार प्रदान!

## इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्डमध्ये स्मार्ट सारथी ॲप देशात दुसरे

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
भारत सरकारच्या इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्डमध्ये गव्हर्नन्स श्रेणीत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीच्या स्मार्ट सारथी ॲपने देशात दुसरे स्थान पटकाविले. याबद्दल इंदौर (मध्यप्रदेश) येथे झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांना सन्मान चिन्ह व पुरस्कार प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, स्मार्ट सारथी ॲप प्रकल्प प्रमुख अंकीत भार्गव हे देखील उपस्थित होते. इंदौर (मध्यप्रदेश) येथे बुधवार, दि. २७ सप्टेंबर रोजी इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्ड कार्यक्रमात केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार राज्यमंत्री



कौशल किशोर, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्यपाल मंगुभाई पटेल, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाचे (चेक्गअ) सचिव मनोज जोशी, भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशनचे सहसचिव आणि मिशन संचालक कुणाल कुमार यांच्यासह विविध स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विविध मान्यवर उपस्थित होते. देशभरातील ८० पात्रताधारक शहरांमधून पिंपरी चिंचवडला गव्हर्नन्स पुरस्कार प्राप्त झाला आहे. पिंपरी चिंचवडने देश पातळीवरील दुसरे तर राज्यात पहिल्या क्रमांकाचे यश संपादन केले. हे यश म्हणजे पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी एक गौरवाची बाब असून पुन्हा एकदा शहराच्या लौकीकात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी भावना आयुक्त शेखर सिंह यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर व्यक्त केली. इंदौर येथील इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्ड कार्यक्रमात पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत सूरू असलेल्या विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांची माहिती देण्यासाठी स्टॉल उभारण्यात आला होता. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पिंपरी चिंचवड महापालिका व स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सूरू असलेल्या प्रकल्पांची माहिती घेतली. आयुक्त शेखर सिंह यांनी व्हिडीओ चित्रफितीद्वारे प्रकल्पांचे सादरीकरण केले.

यावेळी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, कंपनी सेक्रेटरी चित्रा पंवार, स्मार्ट सारथीचे बिनिश सुरेंद्रन, आशिष चिकणे, किरण लवटे यांनी पिंपरी चिंचवडचे प्रतिनिधीत्व केले. पिंपरी चिंचवड स्मार्ट सारथी ॲप हा एक दूरदर्शी डिजिटल उपक्रम आहे.

पीसीएमसी स्मार्ट सारथी प्लॅटफॉर्मद्वारे ई-गव्हर्नन्सचा वापर तसेच नागरिक सहभाग वाढविण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करत आहे. सध्या सुमारे २ लाखांहून अधिक नागरिक ॲप, वेब पोर्टल आणि सोशल मीडिया चॅनेलद्वारे संवाद साधत आहेत. विविध उपक्रमांमध्ये

> **“स्मार्ट सिटीज मिशन नाविन्यपूर्ण स्मार्ट सोल्यूशन्सद्वारे शहरातील नागरिकांना आवश्यक पायाभूत सुविधा, स्वच्छ आणि टिकाऊ वातावरण आणि सुधारित जीवनमान प्रदान करून शहरी विकास पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शहरी विकासात एक आदर्श बदल साध्य करण्याच्या ध्येयाकडे या मिनशद्वारे महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. पीसीएमसी स्मार्ट सारथी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सध्या सुमारे २ लाख वापरकर्ते ॲप, वेब पोर्टल आणि सोशल मीडिया चॅनेलद्वारे संवाद साधत आहेत. यापुढेही हे सहकार्य मिळत राहील असा आशावाद देखील आयुक्त सिंह यांनी व्यक्त केला.**
> **– शेखर सिंह,**
> **आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी.**

नागरिकांच्या सहभागासाठी पुढाकार, उपयुक्तता अद्यतने, महापालिकेचा ऑनलाइन कर भरणा, ऑनलाईन विवाह नोंद, जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र सुविधा, नागरवस्ती योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा, आयडीचा वापर करून नागरिकांच्या सोयीसाठी तक्रार निवारण यंत्रणा, महापालिका कार्यालये शोधण्यासाठी जीपीएसचा वापर, आपत्कालीन वेळेत संपर्क साधण्यासाठी मदत कार्य, स्थानिक अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी पुढाकार, वेबिनारचे आयोजन, महापालिका आरोग्य अभियानांची माहिती, शैक्षणिक क्षेत्रातील घडामोडी, विकास प्रकल्पांची माहिती, ब्लॉग लेखन यासह कोरोनाच्या प्रादुर्भावापासून नागरिकांचे संरक्षण तसेच नागरिकांच्या कल्याणासाठी या ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

# ‘पावनखिंड’ द्वारे स्वराज्य निष्ठेची जागृती!

## जय बजरंग मित्र मंडळाचा पुढाकार : गणेशोत्सवाची ५३ वर्षांची परंपरा कायम

**मनीषा थोरात-पिसाळ। मोशी-न्यूज एक्स्प्रेस ।**
छत्रपती शिवाजी महाराजांवर जीव ओवाळून टाकणारे वीर शिलेदार मावळे आणि त्यांची यशोगाथा सांगणारा पावनखिंड चा जिवंत देखावा मोशीतील जाधववाडी परिसरात उभारण्यात आला आहे. जय बजरंग मित्र मंडळ आहेरवाडी तालीम यांनी हा देखावा सादर केला आहे. १९७१ सालापासून स्थापन केलेल्या मंडळाद्वारे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, स्त्री-भ्रूण हत्या अशा विविध देखाव्यांचे यापूर्वी सादरीकरण केले आहे. परिसरातील सर्वाधिक आकर्षक आणि महत्त्वपूर्ण संदेश देणारा हा देखावा पाहण्यासाठी गणेशभक्तांकडून गर्दी केली जात आहे. १९७१ साली स्थापन केलेल्या जय बजरंग मित्र मंडळाचे मार्गदर्शक म्हणून विशाल आहेर तर अध्यक्षपदी स्वप्निल गंगणे काम पाहतात. मंडळामध्ये एकूण ८० पदाधिकारी आहेत. दरवर्षी नव्या पिढीतील तरूणांना मंडळामध्ये संधी दिली जाते. एकोपा आणि महाराष्ट्रीयन संस्कृती जपण्यासाठी मंडळ काम करते. भविष्यातील पिढीला शिवाजी महाराज, त्यांचे मावळे त्यांचा इतिहास समजण्यासाठी हा देखावा उभारण्यात आला आहे. अडीच लाख रूपये खर्च या देखाव्यासाठी आला आहे. जय बजरंग मित्र मंडळाकडून यापूर्वी पर्यावरण जनजागृती, स्त्री-भ्रूण हत्या, जेजूरीगड, पवनपूत्र हनुमान, देवींचा महिमा असे सामाजिक, धार्मिक, पर्यावरण यावर देखावे सादर करण्यात आले आहेत. या मंडळाच्या देखाव्यांसाठी आणि कार्यपध्दतीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका, दगडूशेठ चॅरीटेबल ट्रस्ट, गणराया देहूरोडचा यांच्यातर्फे पारितोषिक देण्यात आले आहेत. फक्त गणेशोत्सवापुरतेच मंडळाचे काम मर्यादीत नसून पंढरपूर वारीला अन्नदान, परिसरातील धार्मिक उपक्रम यामध्ये मंडळाचा सहभाग असतो.

### मंडळासाठी राबणारे कार्यकर्ते

**» नितीन आहेर, मनोज आहेर, हनुमंत करपे, गणेश आहेर, विकास आवारी, अभिजीत आहेर, राहूल खराडे, श्री थोरात, विक्रांत आहेर, राहूल आहेर, निलेश आहेर यांच्यासह इतर कार्यकर्त्यांचा सहभाग आहे. मंडळाकडून ५३ वर्षांची परंपरा कायम सुरु ठेवली आहे. दरवर्षी परिसरातील तरूण पिढीला मंडळाच्या कामासाठी संधी दिली जाते. त्यानुसार तरूण पदाधिकारी निष्ठेने संधीचे सोनं करतात. लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सवाची परंपरा सामाजिक सलोखा, एकोपा निर्माण होण्यासाठी सुरु केली. हाच उद्देश ठेवून जय बजरंग मित्र मंडळ कार्यरत असल्याची माहिती मंडळाचे मार्गदर्शक विशाल आहेर आणि अध्यक्ष स्वप्नील गंगणे यांनी दिली.**

# अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात!

## मिरवणूकी दरम्यान प्रत्येक मंडळाचे होणार 'व्हिडीओ रेकॉर्डींग'

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहरामध्ये गणेशोत्सव सणानिमित्त अनंत चतुर्दशी दिवशी सार्वजनिक व घरगुती गणपतींचे विसर्जन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त यांच्या देखरेखीखाली चोख बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे. पिंपरी चिंचवड पोलीस दलाकडून ०५ पोलीस उप आयुक्त, ०८ सहायक पोलीस आयुक्त, ५९ पोलीस निरिक्षक, १७७ सपोनि / पोउप-नि १८५० पोलीस अंमलदार, २३९ होमगार्ड, ०१ एसआरपीएफ कंपनी, ०४ आरसीपी, १८ स्ट्रायकिंग व १६८ ट्राफिंग वॉर्डन असा एकूण २५० अधिकारी व २३५७ अंमलदार यांची बंदोबस्तकामी नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच पुरेसा राखीव बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये विसर्जन मिरवणूकीदरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होवू नये याकरीता शहर पोलीस दलाकडून गणेशोत्सव दरम्यान संवेदनशील भागामध्ये व मिश्र वस्तीमध्ये पथ संचलन करण्यात आलेले आहे. तसेच विसर्जन मार्गावर व प्रत्येक विसर्जनाची ठिकाणे सीसीटिव्ही निगराणीखाली ठेवण्यात आलेली आहेत. गुन्हे शाखेकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारावर १३१३ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. विसर्जन मिरवणूक दरम्यान चोरी पाकिटमारी होवू नये याकरीता गुन्हे शाखेकडून ०५ पथके तैनात करण्यात आली आहेत. शहरातील विविध मिरवणूक मार्गाची घातपात विरोधी तपासणी करण्यात आलेली असून, ध्वनी प्रदुषण करणा-या मंडळाचे नॉईज लेव्हल मिटरव्दारे रिडिंग घेण्यासाठी पथके तयार करण्यात आलेली आहेत. मिरवणूकी दरम्यान प्रत्येक सार्वजनिक मंडळाचे व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालय अंतर्गत येणा-या विसर्जन स्थळासह ८९ नैसर्गिक ठिकाणांव्यतिरिक्त १० कृत्रिम तलावाची महापालिकेतर्फे व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या प्रत्येक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. प्रमुख विसर्जनाच्या ठिकाणी ध्वनीक्षेपक यंत्रणेसह तात्पुरते नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतूकीचे योग्य नियमन करणेकरीता चोख उपाययोजना करण्यात आलेली आहे. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरामध्ये ईद-ए-मिलाद सण साजरा करण्यात येणार असून त्या निमित्ताने शहरात विविध ठिकाणी मिरवणूकांचे आयोजन करण्यात आलेले आहे.



### गुन्हे शाखेकडून ०५ पथके तैनात

» विसर्जन मिरवणूक दरम्यान चोरी पाकिटमारी होवू नये याकरीता गुन्हे शाखेकडून ०५ पथके तैनात करण्यात आली आहेत. शहरातील विविध मिरवणूक मार्गाची घातपात विरोधी तपासणी करण्यात आलेली असून, ध्वनी प्रदुषण करणा–या मंडळाचे नॉईज लेव्हल मिटरव्दारे रिडिंग घेण्यासाठी पथके तयार करण्यात आलेली आहेत.यावेळी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी देखील चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# पाणीपुरवठ्यासाठी आयुक्तांना १५ ऑक्टोबरपर्यंतची डेडलाईन

## चिखली येथील पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात येईल : अजित पवार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिखली परिसर महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून मूलभूत सुविधांपासून वंचित होता. येथील समस्यांबाबत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी याचा पाठपुरावा केला आणि आता अजित पवार यांनी सूचना दिल्यानंतर येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत चिखली येथील पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात येईल. जल शुद्धीकरण केंद्रापासून पंपिंगद्वारे जलवाहिन्यांमधून पाणी टाक्यांपर्यंत नेले जाईल असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे. यामुळे चिखलीतील तब्बल दोन लाख नागरिकांना पाणीटंचाईपासून मोठा दिलासा मिळाला आहे. अशी माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची माहिती दिली. पिंपरी चिंचवड शहरातील चिखली हा भाग मोठ्या झपाट्याने वाढला. मात्र त्या तुलनेत मूलभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत असल्याने येथील ग्रामस्थांनी नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समोर प्रश्नांची जंत्रीच सादर केली. यानंतर दुसऱ्याच दिवशी अजित पवार यांनी बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, सामाजिक कार्यकर्ते विकास साने, विकास साने, सुभाष मोरे, काळुराम यादव, सदाशिव नेवाळे, अमृत सोनावणे, नवीन बग, गणेश यादव हे नागरिक व पालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे उपस्थित होते. अजित गव्हाणे म्हणाले, चिखली येथील मुख्यत्वे पाणी प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली. चिखली पाटीलनगर येथे महापालिकेने जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. यामध्ये पंपिंगची सुविधा करून येथून चिखली भागासाठी पाईपलाईन द्वारे थेट टाक्यांपर्यंत पाणी पोहोचवले जावे आणि या भागाला पाणीपुरवठा करावा असे नियोजित आहे. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून केवळ पंप बसवला नाही म्हणून या भागाला पाणीपुरवठा अद्यापही सुरू झालेला नाही. ज्यामुळे सातत्याने या भागाला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. याशिवाय चिखली भागातील अनेक रस्त्यांची कामे प्रलंबित आहे. चिखली – सोनवणे वस्ती, चिखली- आकुर्डी, आकुर्डी ते पाटीलनगर, इंद्रप्रस्थ कार्यालय ते विक्टोरिया सोसायटी अशा महत्त्वाच्या रस्त्यांचा यामध्ये समावेश आहे. भूसंपादन झालेले असताना केवळ प्रशासकीय कारभारात हे रस्ते होऊ शकलेले नाही. याबाबत आम्ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तक्रार केली. हे सर्व ऐकून घेतल्यानंतर तातडीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याशी चर्चा केली. रस्ते आणि पाण्याच्या समस्येबाबत नक्की कुठे काय अडले आहे. हे देखील विचारून घेतले तातडीने पाण्याचा प्रश्न निकाली लावा अशा सूचना आयुक्तांना देण्यात आल्या आहेत. येत्या १५ ऑक्टोबर पर्यंत पंप बसवून टाक्यांपर्यंत पाणीपुरवठा झाला पाहिजे असे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले असल्याचे गव्हाणे यांनी सांगितले.



# पादचारी पुलावर पडणार हातोडा!

## कोंडी सोडविण्यासाठी २०१४ मध्ये उभारला होता मार्ग

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित उड्डाणपूल आणि समतल विलगकांना (ग्रेडसेप्रेटर) पादचारी उन्नत मार्गाचा (फूट ओव्हर ब्रीज) अडथळा ठरणार असल्याने पादचारी उन्नत मार्ग काढण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठीच २०१४ मध्ये पादचारी मार्ग उभारण्यात आला होता. मात्र आता त्याचा अडथळा ठरत असल्याचा साक्षात्कार महापालिकेला झाला आहे. त्यामुळे पादचारी मार्ग उभारण्यासाठी केलेला खर्च वाया जाणार असून महापालिकेच्या दोन विभागातील समन्वयाचा अभावही अधोरेखित झाला आहे. नगर रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. मेट्रो मार्गिकेची कामे आणि बीआरटी मार्गामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींकडून केला जात आहे. त्यामुळे नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले असून, त्याअंतर्गत उड्डाणपूल आणि समतल विलगकांची उभारणी करण्याचे नियोजित आहे. त्याबाबतची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत अंतिम करण्यात येणार आहे. मात्र, उड्डाणपूल आणि समतल विलगकांच्या नियोजनात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला विश्रांतवाडी चौकातील पादचारी उन्नत मार्ग अडथळा ठरत असल्यामुळे तो पाडण्याचा विचार सुरू



झाला आहे. प्रस्तावित उड्डाणपूल आणि समतल विलगकांमुळे वाहतूक कोंडी ८० टक्क्यांनी कमी होईल, असा दावा महापालिकेच्या वाहतूक नियोजन विभागाकडून करण्यात आला आहे. विश्रांतवाडी चौक हा वर्दळीचा चौक आहे. आळंदी, पुणे विमानतळ, धानोरी येथील रस्ते या चौकात एकत्र येतात. त्यामुळे या चौकात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने पादचाऱ्यांसाठीही रस्ता ओलांडणे धोकादायक ठरत होते. त्यामुळे २०१४ मध्ये ६ कोटी ३८ लाख रुपये खर्च करून पादचाऱ्यांच्या सुविधेसाठी पादचारी उन्नत पूल उभारण्यात आला. मात्र, नव्या वाहतूक आराखड्यात कोट्यवधी रुपयांचा पादचारी पूल अडथळा ठरत असल्याची उपरती महापालिकेला झाली आहे. हा पूल पाडण्याचे नियोजित असल्याने

> “नगर रस्त्यावरील विश्रांतवाडी चौक प्रमुख आहे. उड्डाणपूल आणि समतल विलगक, भुयारी मार्गांमुळे वाहतूक कोंडी कमी होणार आहे. या सुविधा उभारण्यासाठी पादचारी पूल काढावा लागण्याची शक्यता आहे. विश्रांतवाडी चौकातून लोहगावकडे जाणारा उड्डाणपूल इंग्रजी वाय या आकाराचा असून त्यासाठी हा पूल अडथळा ठरत आहे.
>
> **-अजय वायसे, कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग, पुणे महापालिका**

पादचाऱ्यांनाही गैरसोयीला जावे लागण्याबरोबरच महापालिकेची दूरदृष्टीबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विश्रांतवाडी चौकातील पादचारी उन्नत पुलाची रचना त्यावेळची परिस्थिती लक्षात घेऊन करण्यात आली होती. विश्रांतवाडी आणि परिसरातील वाहनांची संख्या आणि लोकसंख्या पाहता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. चौक ओलांडण्यासाठी केवळ पादचारी पूल हा व्यवहार्य पर्याय ठरत नाही. महापालिकेने केलेल्या सर्वे क्षणातूनही ही बाब स्पष्ट झाली आहे. त्याचा अपेक्षित वापरही होत नसल्याचे दिसून येत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कालबाह्य सुविधांऐवजी नव्या सुविधा द्याव्या लागणार आहेत, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

# महिला विधेयकामुळे महिलांना विकासात सक्रिय सहभाग!

## आरक्षणामुळे राजकारणात नवीन महिला दिसतील : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** स्त्रीयांना मनुष्य म्हणून धोरण प्रक्रियेत सहभागी होता यावे यासाठी आणलेले महिला विधेयक स्वागतार्ह असुन त्याबाबत समाजात प्रचार व प्रसार गरजेचा आहे असे ऊपसभापती विधानपरिषद तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. स्त्री आधार केंद्रातर्फे जागतिक महिला हिंसाचार विरोधी दिनानिमित्त महिला आरक्षण विधेयकाचे स्वागत आणि त्याबाबत खुली चर्चा या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी सहाय्यक समिती, फर्ग्युसन रस्ता, पुणे येथे करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती तथा स्त्री आधार केंद्राच्या



अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे बोलत होत्या. याप्रसंगी माजी आमदार दीप्ती चवधरी, माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे, माजी नगरसेविका रूपाली ठोंबरे पाटील, चंद्रकांता सोनकांबळे, निवृत्त माहिती संचालक श्रद्धा बेलसरे, स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, समाजातील सर्वच घटकांतील स्त्रियांना आरक्षण मिळाले पाहिजे. महिला विधेयक मंजूर केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत डॉ. गोऱ्हे यांनी केले. आरक्षणाचा लाभ हा अनुसूचित जाती जमातीमधील स्त्रियांना देखील लागू असल्याचे त्यांनी नमूद केले. १९३५ साली सरोजिनी नायडू यांनी महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम मांडला असल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षणामुळे आगामी काळात राजकारणात नवीन महिला दिसतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महिलांनी आरक्षणाच्या अंमलबजावणी करिता समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर त्यांची संख्या देखील वाढू शकते अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. आरक्षणाच्या निमित्ताने राजकारणात जनमताची दखल घेतली गेली असल्याचे त्यांनी सांगितले. माजी महापौर दीप्ती चवधरी म्हणाल्या, सरकारने महत्वाचे पाऊल टाकलेले आहे. इतर

### स्त्रियांना आरक्षण मिळाले पाहिजे

» समाजातील सर्वच घटकांतील स्त्रियांना आरक्षण मिळाल पाहिजे. महिला विधेयक मंजूर केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत डॉ. गोऱ्हे यांनी केले. आरक्षणाचा लाभ हा अनुसूचित जाती जमातीमधील स्त्रियांना देखील लागू असल्याचे त्यांनी नमूद केले. १९३५ साली सरोजिनी नायडू यांनी महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम मांडला असल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षणामुळे आगामी काळात राजकारणात नवीन महिला दिसतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महिलांनी आरक्षणाच्या अंमलबजावणीकरिता समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर त्यांची संख्या देखील

मागासवर्गीय जातीच्या आरक्षणामुळे त्यांना स्वतः:ला महापौर पदावर काम करता आल्याचे त्यांनी सांगितले. महिलेला प्रत्यक्ष काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. महिला आरक्षणाबाबत स्त्रियांमध्ये जागृती केली पाहिजे. माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, महिला आरक्षण मिळाले असले तरी त्यासाठी अभ्यास व परिश्रम यातुन महिलांनी गुणवत्ता वाढवली पाहिजे. आरक्षणाच्या निर्णयामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. स्त्रियांनी धाडस केले पाहिजे.

# घरासाठी अर्ज करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी!

## म्हाडाच्या घरास अर्ज भरण्यास २० ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे प्रादेशिक मंडळ पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मार्फत सन २०२३च्या सोडतीसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदर ५८६३ घरांची सोडतसाठी अर्ज भरण्याची मुदत २७ सप्टेंबर पर्यंत देण्यात आली होती. यादरम्यान, अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळावी अशी मागणी नागरिकांकडून होत असल्याने २० ऑक्टोबर पर्यंत अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती म्हाडा पुणे विभागाचे सीईओ अशोक पाटील यांनी बुधवारी दिली आहे. पाटील यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकी जपत महाडच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांसाठी अत्यल्प ,अल्प ,मध्यम व उच्च गटांसाठी घरे उपलब्ध करून दिलेली आहेत.पुणे मंडळांतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यात एकूण पाच हजार ४२५ सदनिका वितरणासाठी उपलब्ध आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ६९ सदनिका तर



सांगली जिल्ह्यामध्ये ३२ सदनिका आणि कोल्हापूर जिल्ह्यात ३३७ सदनिका वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.सदर सदनिकांसाठी एकूण ३२ हजार ९९६ अर्ज आत्तापर्यंत दाखल करण्यात आलेले आहेत. त्यापैकी १८ हजार ३६९ नागरिकांनी प्रत्यक्ष पैसे भरलेले आहेत. गणपती उत्सव व इतर कार्यालयीन सुट्ट्यांमुळे अर्ज भरण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र शासकीय कार्यलयातून उपलब्ध झाले नसल्याने काही नागरिकांना अर्ज दाखल करणे शक्य झाले नाही, त्यामुळे अर्ज भरण्याची मुदत वाढ करण्यात आलेली आहे. सदर अर्ज भरण्यासाठी २० ऑक्टोबर पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली असून नऊ नोव्हेंबर रोजी संबंधित ५,८६३ घरांची ऑनलाइन सोडत होणार आहे.

### मुंबईप्रमाणे प्लॅनिंग ऑथॉरिटी मिळावी

**» अशोक पाटील यांनी सांगितले की, सध्या बांधकाम व्यवसायिक हे प्रत्यक्ष घर बांधण्याचे नकाशे मनपाला सादर करतात, त्यानंतर मनपा त्यांना बांधकामासाठी मंजुरी देते.यामध्ये केवळ २० टक्के म्हाडाला प्लॅन बाबत कारवाई करता येते. मात्र ,मुंबईमध्ये स्वतंत्र प्लॅनिंग ऑथॉरिटी असून ते म्हाडाच्या प्रकल्पांना मंजुरी देते ,त्यामुळे योग्य पद्धतीने घरांचे बांधकाम करता येते. अशाप्रकारची प्लॅनिंग ऑथॉरिटी पुणे महाडा विभागास मिळावी याकरीता सरकारकडे मागणी करण्यात आलेली आहे.त्यामाध्यमातून म्हाडाच्या घरांना आगामी काळात गॅलरी देण्याबाबतही विचार करण्यात येईल.**

# शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास क्रांती घडेल!

## शोषण संपणार नाही तो पर्यंत अस्थिरता : के. सी. त्यागी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शेतकर्यांना कष्टाचे फळ मिळालेच पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात जसी भगतसिंग यांनी क्रांती घडविली त्याचीच पुर्णावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. तसेच एका अहवालानुसार मराठवाड्यातील १ लाख शेतकरी आत्महत्या करण्यास तयार आहेत. त्यामुळे या देशातून जो पर्यंत शोषण संपणार नाही तो पर्यंत सतत अस्थिरतेचे वातावरण राहिल असे मत माजी खासदार के. सी. त्यागी यांनी व्यक्त केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिर्व्हसिटी तर्फे आयोजित सामाजिक नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमात विद्यापीठातील ५ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी माजी प्रशासकीय अधिकारी अजय प्रकाश सावणी, हरीष साई रमणा, अरूण वाखलू ,राहुल कराड हे उपस्थित होते. के. सी. त्यागी म्हणाले, महाराष्ट्रात देशातील ९० टक्के कांदा व टोमॅटोचे उत्पन्न घेतले जाते. तरी सुद्धा शेतकर्यांच्या स्थितित किंचितही बदल घडलेला नाही. माजी कमिश्नर संतोष तटकरे यांनी मराठवाड्यात १० लाख शेतकर्यांवर रिपोर्ट तयार केला आहे. त्यातील १ लाख शेतकरी आत्महत्या करू इच्छित आहेत. या देशात योग्य आर्थीक नियोजन होणे गरजेचे आहे. अन्यथा क्रांतिवीर भगतसिंह सारखी क्रांती घडेल.महिलांना दिलेल्या ३३ टक्के आरक्षणाच्या निर्णयाचे देशात जोरदार स्वागत केले जात आहे. म.गांधी यांचे गुरू लोकमान्य टिळक व महिलांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडणार्या सावित्रबाई फुले हे दोन्ही पुण्यातील असल्यामुळे युवकांनी यांची प्रेरणा घेऊन नेतृत्वाचे गुण अंगिकारावे. अरूण वाखलू म्हणाले, सेवा, उद्देश्य, लक्ष्य व नव्या कल्पना या गुणांमुळे व्यक्तीच्या अंगी नेतृत्वाची कला अवगत होते. हिंमतीच्या जोरावर सर्व काही साध्य होऊ शकते. परंतू या साठी जीवनात शांती सुद्धा अत्यंत महत्वाची आहे. राहुल कराड म्हणाले,शहर आणि ग्रामिण क्षेत्रात अनेक समस्या व आव्हाने आहेत. त्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना कार्य करावे लागेल. समाजसेवेसाठी संशोधन व स्टार्टअपच्या संस्कृतीला प्रोत्साहन दयावे. हरिष साई रमणा म्हणाले, आपण कोणत्या गोष्टीवर फोकस करतो हे अत्यंत महत्वाचे आहे. युवकांनी आपली ऊर्जा सकारात्मक दृष्टीकोणावर केंद्रीत करावे. सतत सकारात्मक लोकांबरोबर राहिल्यास प्रगतीचे द्वार आपोआप उघडले जाते.




### आरक्षणाच्या निर्णयाचे स्वागत

**» महिलांना दिलेल्या ३३ टक्के आरक्षणाच्या निर्णयाचे देशात जोरदार स्वागत केले जात आहे. म.गांधी यांचे गुरु लोकमान्य टिळक व महिलांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडणार्या सावित्रबाई फुले हे दोन्ही पुण्यातील असल्यामुळे युवकांनी यांची प्रेरणा घेऊन नेतृत्वाचे गुण अंगिकारावे. अरूण वाखलू म्हणाले, सेवा, उद्देश्य, लक्ष्य व नव्या कल्पना या गुणांमुळे व्यक्तीच्या अंगी नेतृत्वाची कला अवगत होते.**

# गणपती विसर्जनासाठी महानगरपालिका सज्ज!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गणेश विसर्जनासाठी महापालिका सज्ज असून शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर गणेश मंडळांसाठी तसेच नागरिकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास सुसज्ज रुग्णवाहिका , वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात आली आहेत. घाटांवर जीवरक्षक, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा पथक नेमण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे. यंदाच्या गणेशोत्सवाची सांगता पर्यावरणाचे रक्षण करत सुरक्षित व उत्साहाच्या वातावरणात पार पडावी यासाठी महापालिकेच्या वतीने विविध सेवा सुविधा पुरवण्यात येत आहेत. काळेवाडी मधील स्मशान घाट,निगडी प्राधिकरणातील गणेश तलाव, चिखली स्मशान घाट, पिंपळेगुरव घाट, वाकड गावठाण घाट, मोशी नदी घाट, थेरगाव पूल नदी घाट, वाल्हेकरवाडी मधील जाधव घाट, सुभाषनगर पिंपरीघाट आणि सांगवी येथील वेताळबाबा मंदिर घाट याठिकाणी वैद्यकीय साहित्य, औषधे आणि सुसज्ज रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात आली आहेत. या वैद्यकीय पथकांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, रुग्णवाहिका वाहनचालक सफाई कामगार आदींचा समावेश असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले. स्वयंसेवी संस्थांमार्फत मूर्ती संकलन केले जात असून महापालिकेच्या वतीने गणेश विसर्जन घाटांवर कृत्रिम विसर्जन हौद उभारण्यात आले आहेत. तसेच निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंडांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. अग्निशमन विभागाच्या वतीने शहरातील २६ विसर्जन घाटांवर लाईफ जॅकेट, रिंग, गळ, बोट, मेगा फोन, दोरी अशा रेस्क्यू साहित्यासह अग्निशमन पथक तैनात ठेवण्यात आले आहे.